# डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे
# फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे – ४
# [ वरिष्ठ महाविद्यालय (Senior College)]
# शिष्यवृत्ती सूचना क्र. (६) (२०२३-२४)

**कृपया सर्व सूचना पूर्ण वाचल्या नंतरच अर्ज भरणे बंधनकारक आहे.**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये संगणक शास्त्र (Computer Science UG / PG) मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी अनुसूचित जाती,(SC) व अनुसूचित जमाती,(ST) या संवर्गातून महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे अश्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे, तसेच त्यांनी शिष्यवृत्ती चा ऑनलाईन अर्ज खालील वेब साईटवर भरणे बंधनकारक आहे.

( https://mahadbt.maharashtra.gov.in )

(for SC, ST, Categories)

तरी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती किंवा फ्रीशिप चा अर्ज ऑनलाइन भरून योग्य ती प्रमाणपत्रे आपलोड करून MAHADBT या वेबसाइटवर ऑनलाइनच पुढे महाविद्यालय वेरीफिकेशन करण्याकरिता दिनांक ३० एप्रिल २०२४ पर्यंत पाठवावेत आणि हार्ड कॉपी ३० एप्रिल २०२४ पर्यंत ११.०० ते २.०० या वेळेत महाविद्यालयात शिष्यवृत्ती अर्ज शिष्यवृत्ती विभाग कार्यालयात जमा करावा. तसेच ज्या विद्यार्थ्यांना त्यांचे अर्ज दुरुस्ती साठी विद्यार्थी लॉगीन ला परत पाठीविले जाणार आहेत त्यांनी त्यांचे अर्ज दुरुस्ती करून ताबडतोब शिष्यवृत्ती कार्यालयात व MAHA DBT पोर्टलवर ऑनलाइन जमा करावेत. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज स्वतः भरावा दुसऱ्या कोणाकडूनही भरून घेऊ नये. बरेच विद्यार्थी शिष्यवृत्ती चे अर्ज ऑनलाइन भारत नाही आहेत, कृपया सर्वांनी अर्ज लवकरात लवकर भरावेत व शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा.

१. **ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यानी आधार बेसनेच भरणे बंधनकारक आहे नॉन आधार या ऑप्शन चा वापर करू नये तसेच विद्यार्थ्यांचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे** . आधारकार्डला मोबाईल नंबर व विद्यार्थ्याचे बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे तसेच बँक खाते हे NPCI पोर्टल ला लिंक असणे अत्यावश्यक आहे त्या शिवाय शिष्यवृत्ती लाभाची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार नाही, तसेच महाविद्यालयाच्या खात्यावरही जमा होणार नाही, तसे आढळून आल्यास विद्यार्थ्यांना फीची उर्वरित रक्कम महाविद्यालयात जमा करावी लागेल .तसेच MAHADBT या वेब साइटवर आधार बँक लिंक Aadhaar bank

link हा नवीन Tab सुरू करून देण्यात आला आहे, सर्व विद्यार्थ्यांना असे सूचित करण्यात येते की या Tab वर क्लिक करून आपले आधार नंबर सेव्हिंग बँक अकाऊंटला लिंक आहे की नाही हे तपासून घ्यावेअन्यथा विद्यार्थ्यांच्या .बँक अकाऊंट मध्ये .रक्कम जमा होणार नाही याची गांभिर्याने नोंद घ्यावी .

२. ऑनलाईन अर्ज भरताना आधार कार्डला लिंक असलेल्या मोबाईल वर OTP येतो तो Verified करावा.

३. खालील शिष्यवृत्ती/ फ्रीशिप चा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्याने http://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर लॉगीन करून त्यातील Profile मधील सहा टॅब (Personal Information, Address Information, Other Information, Current Course, Past Qualification, Hostel Details) व्यवस्थित भरणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी द्वितीय (SY) व तृतीय (TY) तसेच M.Sc. II प्रवेशीत आहेत अशा विद्यार्थांनी त्यांचे अर्ज नूतनीकरण करणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांनी मागील वर्षी भरलेली माहिती तपासून पहावी.

४. प्यारा क्र. ३ मध्ये दिलेली माहिती ही फ्रेश विद्यार्थ्यांनी भरणे आवश्यक आहे, तसेच जे विद्यार्थी 2 year व 3 year, M.Sc. II ला आहेत आशा विद्यार्थ्यांनी प्रोफाइल ची माहिती पुन्हा भरणे आवश्यक नाही.

५. जे विद्यार्थी 2 year व 3 year, M.Sc. II ला आहेत आशा विद्यार्थ्यांनी renewal option व्यवस्थित पाहून शिष्यवृत्ती अर्ज भरणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांनी अर्ज जमा करतांना अर्जा सोबत त्या वर्षाचे फी चलन, मागील वर्षाची मार्कशीट जमा करणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी मागील वर्षातील परीक्षेचे गुण भरताना टक्केवारी (उदा. % )मध्ये भरावे, CGPA मध्ये भरू नये.

७. ऑनलाईन वेबसाईटवर ३५ प्रकारच्या शिष्यवृत्ती दिलेल्या आहेत त्यापैकी विद्यार्थ्याला लागू असलेल्या शिष्यवृत्तीचा पर्याय निवडून त्या शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे आवश्यक आहे. उदा.

८. विद्यार्थ्यांनी Declaration Form DBT वेबसाइट वरून डाउनलोड करून भरू द्यावा व या वेबसाइटवर अपलोड करावा.

९. शैक्षणिक वर्ष २२-२३ मध्ये अनुसूचीत जाती SC, व अनुसूचीत जमाती ST या प्रवर्गा मधून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २.५ लाखाच्या आत आहे त्या विद्यार्थ्यांनी Goevrnment of India Post-Matrik Scholarship (Scholarship) ही स्कीम निवडावी, तसेच ज्या पालकांचे उत्पन्न २.५ लाखाच्या पुढे आहे त्या विद्यार्थ्यांनी Post-Matrik Tuition fee and Examinations Fee (Freeship) ही स्कीम निवडावी. ST या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी Post-Matrik Scholarship Scheme (Government of India) (Scholarship) आणि Tuition Fee and Exam Fee for Tribal Students (Freeship) ही स्कीम निवडावी.

1) SC Scholarship साठी :-

Social Justice and Special Assistance Department मध्ये

- Government of India Post-Matric Scholarship (Scholarship)
- Post-Matric Tuition Fee and Examination fee (Freeship)

2) ST Scholarship / Freeship साठी :-

Tribal Development Department मध्ये

- Post - Matric Scholarship Scheme (Government of India) (Scholarship)
- Tuition Fee & Exam Fee for Tribal Students (Freeship)

**दिनांक :०१/०४/२०२४** **प्राचार्य**

## शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना (२०२३-२४)

अनुसूचित जाती व जमाती, (SC,ST,) या संवर्गातील शिष्यवृत्ती साठी आवश्यक प्रमाणपत्र. सदर विद्यार्थ्यांना असे सूचित करण्यात येते की खलील सर्व प्रमाणपत्रे ही लवकरात लवकर प्राप्त करून घेऊन शिष्यवृत्ती अर्ज वेळेत भरणे गरजेचे आहे.

## Required document

1. School Leaving Certificate / Transfer certificate.
2. Caste Certificate.
3. Caste Validity Certificate if applicable.
4. Domicile Certificate.
5. Income certificate (Year 2022-23 or 2023-24) of Collector Office
6. Gap Certificate if applicable.
7. Statement of Marks 10th & 12th / UG / PG.
8. EID / UID No. (Aadhar Card)
9. Ration Card photo copy
10. Fees challan (Current year)
11. Aadhar Seeded Bank details with NPCI Mapping (Very Important)
12. Bank Passbook Front Page photo copy with MICR & IFSC Code.
13. Hostel Admission Fee Receipt.

(All documents should be self attested)

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे – ४
[वरिष्ठ महाविद्यालय (Senior College)]
शिष्यवृत्ती सूचना क्र. ६ (२०२३-२४)

# शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विना अनुदानित विभागात अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती संवर्गात (SC, ST) प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी महा डीबीटी संकेत स्थळावर अर्ज भरतेवेळी करंट प्रोफाइल मध्ये ज्या ठिकाणी Fee Paid आहे त्या ठिकाणी NO करावे व शिक्षण शुल्क 00 करावे.
- शिष्यवृत्ती अर्ज संकेतस्थळावर भरून महाविद्यालयात जमा केल्या नंतर त्या अर्जा मध्ये काही त्रुटि आढळल्यास महाविद्यालयाकडून असे अर्ज दुरूस्ती करिता विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन परत पाठविले (Resend) जातील. परत पाठविलेले अर्ज विद्यार्थ्यांनी दुरूस्ती करून ताबडतोब महाविद्यालयाच्या लॉगिनला पाठवावेत व त्या अर्जाची प्रत महाविद्यालयात जमा करावी.
- शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना महाविद्यालय व शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेले सर्व SMS विद्यार्थ्यांनी आपल्या मोबाइल वर जतन करून ठेवणे बंधनकारक आहे तसेच विद्यार्थ्यांनी MAHA DBT पोर्टलवरील निर्गमित झालेले पेमेंट व्हाउचर विद्यार्थी लॉगिन मध्ये जाऊन त्वरित रिडिम करावेत. यासाठी विद्यार्थ्यांनी आपला युजरआयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे बंधनकारक आहे.
- शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न आहेत की नाही याची पडताळणी / खातरजमा आधार पोर्टल https://resident.uidai.gov.in/bank-mapper या लिंक वरती जाऊन करावी, तसेच आधार ॲक्टिव आहे किंवा नाही याबाबत देखील सादर पोर्टल वरुन खातरजमा करावी.
- जे विद्यार्थी नियमित तारखेस अर्ज सादर करणार नाहीत त्यांना शासनाकडून शुल्क प्राप्ती होणार नाही व त्यांना उर्वरित शैक्षणिक शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरणे बंधनकारक राहील .

**दिनांक : ०१-०४-२०२४**

**प्राचार्य**